**पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर.**
**मिलकॉर्नर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, औरंगाबाद-४३१ ००१**
**दूरध्वनी क्रमांक ०२४०-२२४०५९१, फॅक्स क्र. ०२४०-२२४०५९६**
**ईमेल-cp.aurangabad@mahapolice.gov.in**

---

जा.क्रं. विशा/लोकसभा/निवडणुक/२०१९- ५४ औरंगाबाद, दि १९/०३/२०१९.

**( महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ अन्वये आदेश)**

**आ दे श**

ज्या अर्थी, पोलीस निरीक्षक, विशेषशाखा, औरंगाबाद शहर यांनी माझ्या निदर्शनास आणुन दिले आहे की, दिनांक १०/०३/२०१९ ते २३/०५/२०१९ या कालावधीत लोकसभा -२०१९ ची निवडणुक होणार असल्याने दरम्यानच्या काळात निवडणुक संबंधाने राजकीय नेते व इतर संघटना या सार्वजनिक ठिकाणी बैठका, प्रचार सभा, प्रचार फेरी इत्यादी कार्यक्रम आयोजित करतात. अशा वेळी पोलीस आयुक्तालय, औरंगाबादचे कार्यक्षेत्रात वरील नमुद कार्यक्रमाच्या वेळी नियमन व नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व पोलीस ठाणे तसेच सर्व शाखा चे प्रभारी अधिकारी, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उप आयुक्त यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ अन्वयेचे अधिकार प्रदान करणे गरजेचे आहे.

तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम-१४४ (१)(३), महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१ चे ३७ (१)(३), ३३ (एन) आणि लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ मधील कलम-१२७ (अ) प्रमाणे निवडणुकीच्या काळात प्रतिबंध घालण्यात येणार मनाई आदेश मा.पोलीस आयुक्त यांचे वतिने पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर यांना असे आदेश निर्गमीत करण्यासाठी अधिकार प्रदान करणे गरजेचे आहे.

त्या अर्थी, मी चिरंजीव प्रसाद, पोलीस आयुक्त, औरंगाबाद महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ मधील प्राप्त अधिकारान्वयेचे अधिकार पोलीस आयुक्तालय, औरंगाबादचे कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाणे तसेच सर्व शाखा चे प्रभारी अधिकारी, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उप आयुक्त यांना दिनांक २०/०३/२०१९ चे ००.०१ ते दिनांक २७/०५/२०१९ चे २४.०० या कालावधी करिता प्रदान करण्यात येत आहे.

माझ्या सही व शिक्यानिशी आज दिनांक १९ मार्च २०१९ रोजी आदेश पारित करीत आहे.
ठिकाण :- औरंगाबाद

**( चिरंजीव प्रसाद )**
पोलीस आयुक्त, औरंगाबाद

प्रति,

सर्व पोलीस उप आयुक्त व सहाय्यक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर.
सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, औरंगाबाद शहर.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, औरंगाबाद
व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद
जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद.

२/- यांनी सदरचे आदेश सर्व स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी द्यावे.